**कार चोरी करून प्रवाशी म्हणुन लिफ्ट देण्याचा बहाणा करून सोन्याचे दागिने, लॅपटॉप, मोबाईल चोरून नेणारी आंतरराज्यात चोरी करणारी ५ जणांची टोळी गजाआड करून लाखोंची मालमत्ता हस्तगत युनिट क्र.३ गुन्हे शाखेची मोठी कारवाई**

श्री. अमितकुमार तेजबीरसिंग त्यागी, वय २८ वर्षे रा. अे ४०६ मैत्री आयकॉन प्लॉट क्र. ३ सेक्टर क्रमांक १९ खारघर नवी मुंबई हे दिनांक २३/११/१७ रोजी १२.१५ वाजता नातेवाईक यांना पुणे विमानतळ येथे सोडून मुंबई येथे जाणेसाठी पुणे स्टेशन येथे रात्री ०१.०० वाजता आले व तेथे मुंबई येथे जाणारे प्रायव्हेट पांढऱ्या रंगाचे स्कॉडा कार नंबर एमएच १२ २३०६ या कारमध्ये बसुन जात असताना अगोदरच सहप्रवाशी म्हणुन बसलेले दोन प्रवाशी व ड्रायव्हर यांनी मिळुन संगनमत करून फिर्यादीस चाकु व कुकरीचे हत्यारांनी धाक दाखवुन लॅपटॉप, मोबाईल, पॅनकार्ड, बजाज कंपनीचे आयकार्ड, एक्सेस कार्ड व अेटीम कार्डवरून व खिशातील सर्व मिळुन रूपये काढुण वाकड येथे सोडुन दिले याबाबत बंडगार्डन पोलीस ठाणे गुरनं. ३७९/१७ भादंविक. ३९२,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

अशाच प्रकारचा गुन्हा येरवडा पोलीस ठाणे येथे पुन्हा दिनांक २८/११/१७ रोजी दाखल झाला होता.

श्रीमती रश्मि शुक्ला, पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी गुन्हे शाखेला गुन्हयाचा समांतर तपास लवकरात लवकर करून उघडकीस आणण्याच्या सुचना दिल्या, त्या सुचनेनुसार श्री. प्रदिप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, श्री. पंकज डहाणे, पोलीस उप आयुक्त, गुन्हेशाखा, श्री. समीर शेख, सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हेशाखा१ यांनी श्री. सिताराम मोरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, युनिट क्र. ३ गुन्हेशाखा यांना व त्यांचे स्टाफला मार्गदर्शन व सुचना देवुन गुन्हे उघडकीस आणण्याबाबत आदेशित केले होते.

वरीष्ठांचे सुचनानुसार वरील गुन्हयांचा समांतर तपास करत असताना सिताराम मोरे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक यांना मिळालेल्या बातमीवरुन पुणे स्टेशन जयप्रकाश नारायण गार्डन येथे आरोपित नामे-

१) अशोक गणपत बनसोडे, वय ३४ वर्षे रा. संकेत मंगल कार्यालयाशेजारी गोंधळेनगर हडपसर, मुळ लातुर
२) मोहसीन आयुब पठाण, वय २७ वर्षे रा. गॅलेक्सी डी बिल्डींग कौसरबाग कोंढवा
३) आरबास युनूस पठाण, वय २६ वर्षे रा. लेन क्र. १ सय्यदनगर हडपसर
४) मुकेश कांतीलाल चव्हाण, वय २२ वर्षे रा. बनकर कॉलनी सातववाडी हडपसर
५) निखील रविंद्र बामणे, वय २३ वर्षे रा. जुनी वडारवाडी बाबा हॉस्पिटल लेंननंबर ५१

यांना दिनांक ११/१२/१७ रोजी २०.३० वाजता वरील गुन्हयात अटक करून **त्यांचेकडुन एकुण किंमत रूपये १५,३५,०१० ची मालमत्ता, एकुण २ लॅपटॉप, १२ मोबाईल अॅन्ड्राईड फेन्स, २ सोन्याच्या आंगठया, १ सोन्याची चैन, १ प्लसर मोटार सायकल, १ स्कॉडा कार, दोन बनावट नंबरप्लेट, १ कुकरी, १ रामपुरी चाकु, लाल मिरची पुड व इतर कागदपत्रे, फिर्यादीचीं ओळखपत्रे, वेस्टकोट हस्तगत करून** एकुण १४ जबरी चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यात आलेले आहेत. ते गुन्हे खालीलप्रमाणे-

१) बंडगार्डन गुरक्र. ३७९/१७ भादंविक. ३९२,३४
२) येरवडा गुरक्र. ८७१/१७ भादंविक. ३९२,३४
३) येरवडा गुरक्र. ९०३/१७ भादंविक. ३९२,३४
४) हिंजवडी गुरक्र. ५४६/१७ भादंविक. ३९२,३४

५) भारती विद्यापीठ गुरक्र. ५९३/१७ भादंविक. ३९२,३४
६) भारती विद्यापीठ गुरक्र. ५९७/१७ भादंविक. ३९२,३४
७) शिवाजीनगर गुरक्र. ३५५/१७ भादंविक. ३७९
८) खेड पुणे ग्रामीण गुरक्र. ५१८/१७ भादंविक. ३९२,३४ आर्म कायदा कलम ४ (२५) महाराष्ट्र पोलीस कायदा ३७(१) सह १३५
९) विरार ०/१७ भादंविक. ३९२,३४
१०) हडपसर गुरक्र. /१७ भादंविक.३९२,३४

आरोपित अशोक बनसोडे याचेंविरूध्द लातुर, पुणे शहर व दिडोंशी येथे खालीलप्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

१. शिवाजीनगर लातुर गुरक्र. १२६/१४ भादंविक. ४५४,३८०
२. शिवाजीनगर लातुर गुरक्र. १४१/१४ भादंविक. ४५४,३८०
३. शिवाजीनगर लातुर गुरक्र. १४९/१४ भादंविक. ४५४,३८०
४. लातुर ग्रामीण गुरक्र. १४२/१४ भादंविक. ४५४,३८०
५. लातुर ग्रामीण गुरक्र. १४३/१४ भादंविक. ४५४,३८०
६. लातुर ग्रामीण गुरक्र. १६५/१४ भादंविक. ४५४,३८०
७. निगडी पुणे शहर गुरक्र. १५९/१४ भादंविक.३६३,३६६,३७६
८. दिंडोशी मुंबई /१४ भादंविक. ३०२

आरोपित निखील रविंद्र बामणे, याचेविरूध्द दाखल असलेले गुन्हे

१. चतुश्रृंगी गुरक्र. ९७/१२ भादंविक. ३९४,३४
२. चतुश्रृंगी गुरक्र. ८६/१६ भादंविक. ३५४, ४५१,५०६ पास्को ७ व ८ असे गुन्हे दाखल आहेत.

आरोपित अशोक बनसोडे, प्रविण चव्हाण व निखिल बामणे असे बलात्कार व विनयभंगाचे गुन्हयात शिक्षा भोगत असताना त्यांची ओळख झाली त्यानंतर अशोक बनसोडे ची शिक्षा भोगुन झाले नंतर तो बाहेर आला व प्रविण चव्हाण याचे ओळखिने प्रविणचा भाऊ मुकेश चव्हाण याचेकडे पुण्यात आला , मुकेशने अशोकला एक मोबाईल हॅण्डसेट, व मित्राची प्लसर मोटार सायकल देवुन मित्राचे घरी रहाणेची सोय केली. नंतर अंशोकने निखील बामणे हा शिक्षा भोगुन बाहेर आलेने त्याला घेवुन स्कॉडा कार शिवाजीनगर येथुन चोरी केली, व त्या कारचे नंबर बदलुन व कारवर मागेपुढे काचेवर इंग्रजीत आर्मी अशी अक्षरे लिहुन कारचा वापर करून वरील गुन्हे केलेले आहेत.

वरील कामगिरी गुन्हे शाखचे श्री. प्रदिप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, श्री. पंकज डहाणे, पोलीस उप-आयुक्त, श्री. समीर शेख, सहाय्यक पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली व सुचनाप्रमाणे गुन्हे शाखा युनिट ३ चे श्री. सिताराम मोरे, पोलीस निरीक्षक,श्री. रविंद्र बाबर, सहाय्यक पोलीस निरीक्षक , श्री. एन.बी. भोसले पोलीस उप निरीक्षक, अशोक भोसले, रोहिदास लवांडे, गुणशिंलन रंगम, अनिल भोसले, शिवानंद स्वामी, अतुल साठे, गजानन गाणबोटे, अजिनाथ काळे, संदीप तळेकर, कल्पेश बनसोडे, महेंद्र पवार पोशि संदीप राठोड, चालक पोशि सुजित पवार यांनी केली आहे.

गुन्हयाचा पुढिल तपास गुन्हे शाखा युनीट ३ पुणे शहर कडिल श्री. बाबर हे करीत आहेत.


गुन्हे शाखा,
युनिट ३, पुणे शहर
MH.14.DY.1985
M H-14-DY-1985
TOSHIBA